


मोहोळ : प्राथमिक शाळेत ऋतुजा वाघमोडे व रत्नप्रभा चंदनशिवे यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# सौंदणे शाळेत सायबर सुरक्षेवर जनजागृती

**मोहोळ :** सौंदणे (ता. मोहोळ) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत 'सायबर सुरक्षेवर जनजागृती कार्यक्रम' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र 'व 'संकुल क्विक हिल फाऊंडेशन पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांनी ऋतुजा वाघमोडे व रत्नप्रभा चंदनशिवे यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आजच्या ऑनलाईन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दलची उदाहरणाद्वारे माहिती दिली. फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी आरोपी कोणास सांगू नये. यावेळी शाळेतील शिक्षक सुनील गायकवाड, आण्णासाहेब कुंभार, सु. गो. सुतकर, बा. वा. वसेकर, आ. दा. कुंभार, सी. गं. आदलिंगे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य तसेच विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

रमेश दास,मोहोळ